**BEFORE THE CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM**
**AURANGABAD ZONE, AURANGABAD**

**( Case No. CGRF / AZ /AUR /U / 299 / 2010 / 26 )**

Shri Sukhdeo M. More,
Plot No. 19/A, CTS No. 20728,
Jaltaran Talau Road, Garampani,
Aurangabad.
**(Consumer No. 4900111797706)**

**Consumer Complainant.**

**V/s**

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPNAY LTD. Urban Circle, Aurangabad.**

**The Distribution Licensee.**

**Date:- 07.08.2010**

**Sub**: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission, (Consumer Grievance Redressal Forum and Ombudsman) Regulations, 2006.

**INTERIM ORDER**

The consumer has filed his grievance in the Forum regarding wrong bills issued by the Distribution Licensee and also requested the Forum to pass an interim order directing the Distribution Licensee not to disconnect electricity supply of his Residential premises on account of wrong bills issued by the D.L..

The grievance of the consumer was admitted as per Regulation No. 6.5 of Maharashtra Electricity Regulatory Commission. The emergency hearing on the application of the consumer for passing an interim order on 07.08.2010 i.e. today itself..

On the date of hearing, i.e. on 07.08.2010, consumer Shri Sukhdeo M. More party in person present and Opponent Nodal Officer Shri Bharati, EE(Admn.) O&M Urban Circle, Aurangabad Shri Suralkar Dy.EE & Shri K.D.Kulkarni, LDC, from D.L.side The consumer received the bill of June 2010 for Rs. 54,570/- with arrears amounting to Rs. 48,000/-. and consumer is not agreed to pay the energy bill. The consumer states that due to previous faulty meter these arrears are arise. He wants the correct energy bill. On the other side Distribution Licensee states that the above said bill is correct and consumer’s meter was replaced in month of July 2009 due to burnt, and before that in September 2007 to December 2007 door lock billing was done and in January 2008 to March 2008, during this period the status was inaccessible so in April 2008 as per reading of consumer’s meter bifurcation/distributing eight months as a average. Rs. 6365=56 and Rs.2557.28 credit was given respectively.

Consumer shows various correspondence and willingness to pay the energy bill but no part payment was allowed so these arrears are arise. and consumer was paid. last bill Rs. 1150/- i.e. 21.03.2009 and since that there is no payment was done by consumer so D.L. temporary disconnect his electric supply on 31.07.2010.

We heard both the parties at length and come to the conclusion that in view of essential service like electricity and on consumer request for reconnect the electricity supply . The Forum allow to pay Rs.27000/- in two installments i.e. Rs, 20,000/- immediately and balance amount paid within 15 days upto date 23.08.2010 Due to the Forum accepted the submission of the consumer.

Distribution Licensee is directed to immediately reconnect the supply of consumer within two hours from the receipt of the payment. Of Rs.20,000/- and not to disconnect the electricity supply after reconnection till the disposal of this case and report to the Forum..

Hence this Interim Order is passed.

Further proceedings in this matter is kept on 24.08.2010

| | |
|---|---|
| **( V.S.Kabra)** | **( P.A.Sagane)** |
| **Member** | **Member Secretary** |

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२९९/२०१०/२६

तक्रार दाखल दिनांक :- ०५/०८/२०१०
निकाल दिनांक :- ०५/१०/२०१०

श्री सुखदेव मराजी मोरे,
जलतरण तलाव रोड,
गरम पाणी औरंगाबाद.
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११७९७७०६) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | प्रदीप. अ. सगणे | अध्यक्ष / सदस्य सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०५/०८/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०७/०८/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९००११७९७७०६ असा आहे. दिनांक ०१/०५/२००८ रोजी ग्राहकाचे विद्युत मीटर अचानक जळाल्यामुळे त्यांनी मीटर बदली करण्याबाबत महावितरणच्या संबंधित कार्यालयात अर्ज दाखल केला आहे परंतु त्यांचे मीटर बदली करण्यात आले नाही.याउलट त्यांना सरासरी आकारणीची वीज देयके देण्यात आली. माहे एप्रिल २००९ रोजी ग्राहकास ४९३५ युनिट वापर दाखवुन २०,९५१/-रुपयाचे वीज देयक देण्यात आले.वरील देयक दुरुस्त करण्याबाबत व नादुरुस्त मीटर बदली करण्याबाबत ग्राहकाने महावितरण कंपनीकडे दिनांक २४/१२/२००७,२०/०५/२००८,१५/०२/२००९,१५/०३/२००९ व १५/०४/२००९ रोजी तक्रार अर्ज दिलेले आहे.परंतु त्यांना सुधारीत वीज बिल न देता महाविरतण कंपनीने दिनांक ३१/०७/२०१० रोजी कोणतीही पुर्व सुचना न देता वीज पुरवठा खंडीत केला. ग्राहकाने आपल्या तक्रार अर्जात असे निवेदन केले की, खंडीत वीज पुरवठ्यामुळे त्यांचे मुलांचे शिक्षणाचे अतोनात नुकसान होत आहे. व वडील वयोवृध्द असल्यामुळे त्यांना विद्युत पुरवठ्याची अंत्यत अवश्यकता आहे. ग्राहकाने तात्पुरती वीज बिल रक्कम भरण्याची तयारी दर्शवुन अंतरिम आदेश देण्याबाबत मंचास विनंती केली. तसेच झालेल्या नुकसानीबाबत व मानसीक त्रासापोटी रुपये १०००/- नुकसान भरपाई देण्याबाबत, व नुकसान भरपाईची रक्कम संबंधित अधिका-यांच्या पगारातुन वसुन करण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली.

२) वरील प्रकरणात ग्राहकाचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबत अंतरिंम आदेश पारीत करण्याबाबत ची सुनावणी दिनांक ०७/०८/२०१० रोजी ठेवण्यात आली. सुनावणी नोडल अधिकारी श्री भारती व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाच्या तक्रारी बाबत संबंधित उपविभागाकडुन माहीती प्राप्त न झाल्यामुळे आपली बाजु मांडण्यास असमर्थता व्यक्त केली. ग्राहकाच्या सी.पी.एल.चे निरीक्षण केले असता असे दिसुन आले की, ग्राहकास जुलै २००७ पासुन मीटर रिडींग न घेता सरासरी आकारणीची वीज देयके देण्यात आलेली आहेत. व माहे एप्रिल २००९ सप्टेबर २००९ मध्ये अवास्तव वीज बिल आकारणी करण्यात आलेली आहे त्यामुळे ग्राहकास सुधारीत वीज बिल देणे गरजेचे असल्याचे आढळुन आले. सी.पी.एल.चे निरीक्षण केले असता ग्राहकाकडे माहे जुन २०१० अखेर ५४,५६९/- थकबाकी असल्याचे आढळुन आले. मंचाने अंतरिम आदेश पारीत करुन एकुण थकबाकी पैकी ५०% थकबाकी म्हणजे रुपये २७,०००/- दोन हप्त्यात भरण्याचे आदेश ग्राहकास दिले. वरील रक्कमे पैकी रुपये २०,०००/- ग्राहकाने भरल्यास त्याचा वीज पुरवठा सुरु करावा व ग्राहकाने थकबाकीचा दुसरा हप्ता रुपये ७,०००/- पंधरा दिवासांचे आत भरावा. असा अंतरिम आदेश देण्यात येवुन पुढील सुनावणी दिनांक २४/०८/२०१० रोजी ठेवण्यात आली.

२) दिनांक २४/०८/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी उपस्थित होते परंतु वीज ग्राहक उपस्थित झाले नाहीत.नोडल अधिकारी यांनी लेखी निवेदन करुन सांगीतले की,मंचाचे अंतरिम आदेशानुसार ग्राहकाने वीज देयकाचा भरणा केला नसल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा सुरु

करण्यात आलेला नाही. नोडल अधिकारी यांनी मंचात ग्राहकाचे सी.पी.एल.व मीटर बदली अहवालाचे प्रत सादर केली. मीटर बदली अहवालाचे निरिक्षण केले असता त्यावरील मीटर क्रमांक व सी.पी.एल.वरील मीटर क्रमांकात तफावत आढळुन आल्यामुळे मंचाने नोडल अधिकारी यांना मीटर बदली अहवाल रजिष्टर व ग्राहकाचे स्थळ निरिक्षण अहवाल सादर करण्याचे सांगुन पुढील सुनावणी  दिनांक ०७/०९/२०१०रोजी ठेवण्यात आली,

४) दिनांक ०७/०९/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस वीज ग्राहकाने आपले प्रतिनिधि मार्फत आजारी असल्यामुळे उपस्थित राहु शकत नसल्याबाबत अर्ज मंचात सादर केला. नोडल अधिकारी यांनी आपला लेखी जबाब व स्थळ निरिक्षण अहवाल सादर केला.मंचाने ग्राहकास आपली बाजु मांडण्याकरीता शेवटची संधी म्हणुन पुढील सुनावणी दिनांक २१/०९/२०१० रोजी ठेवली.

५) दिनांक २१/०९/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी व वीज ग्राहक उपस्थित होते.ग्राहकाने मंचाचे अंतरिम आदेशानुसार रुपये २७,०००/- वीज देयक भरुन वीज पुरवठा झाल्याचे सांगीतले. मीटर बदली अहवालावरील मीटर नंबर रिडींगचे खोडाखोडी बाबत नोडल अधिकारी खुलासा सादर करु शकले नाही.दोन्ही बाजुकडुन चे म्हणने ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

६) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागद पत्रा वरुन व ग्राहकाचे सी.पी.एल.वरुन असे दिसुंन येते की, ग्राहकाने विद्युत पुरवठा घेतल्यापासुन  म्हणजे  जुन २००७ पासुन ते जुलै २००९ पर्यत मीटर रिडींग न घेता सरासरी आकारणीची वीज देयक देण्यात आली.सी.पी.एल.वरील नोंदी नुसार माहे जुलै २००९ मध्ये  मीटर क्रमांक ५०५३४७५ (अंतिम वाचण ७४३२) बदली करुन त्याजागी ११३३२४२५ क्रमांकाचे मीटर लावण्यात आल्याचे दिसुन येते, माहे जुन २००७ ते जुलै २००९ या २६ महीन्याच्या कालावधीत ग्राहकाचा वीज वापर ७४३२ युनिट झालेला दिसुन येत आहे. म्हणजेच सरासरी वीज वापर (७४३२÷२६)=२८५ युनिट प्रतिमाह दिसुन येतो. ग्राहकाने आपले मीटर दिनांक ०१/०५/२००८ ला जळाले व ते तक्रारी करुनही दिनांक २२/०६/२००९ पर्यंत बदली न केत्यामुळे अवास्तव वीज वापर दाखवुन वीज बिल दिल्याचे आपल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे माहे ऑगस्ट २००९ ते मार्च २०१० च्या कालावधीमध्ये नविन मीटर नुसार ग्राहकाचा एकुण ३२४७ दिसुन येतो, त्या मीटरद्वारे ग्राहकाचा सरासरी वीज वापर (३२४७÷८)=४०५ युनिट प्रति माह दिसुन येत आहे. तसेच दिनांक १०/०३/२०१० रोजी लावलेल्या मीटर प्रमाणे ग्राहकाचा वीज वापर (३३५४÷५) ६७० युनिट प्रति माह दिसुन येतो त्यामुळे मीटर क्रमांक ५०५३४७५ द्वारे दिनांक २२/०७/२००९ पर्यंत झालेला वीज वापर संयुक्तीक असुन वरील कालावधीत जास्त बिल प्राप्त झाल्याबाबत ग्राहकाची तक्रार योग्य नाही जून २००७ ते जुन २०१० या कालावधीत मीटर रिडीग नुसार वीज बिल न देता सरासरी प्रमाणे वीज बिल देण्यात आल्याचे दिसुन येते. यावरुन  असे दिसुन येते की, महावितरण कंपनीने ग्राहकास नियमीत रिडींग घेवुन वीज बिल न दिल्यामुळे ग्राहकाने त्याचा भरणा केलेला नाही व चुकीच्या वीज बिलावर ग्राहकास माहे जुलै २०१० अखेर रुपये ५४९९/- व्याज व दंडाची आकारणी करण्यात आलेली असल्याचे दिसुन येत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेली माहे जुन २००७ ते जुलै २००९ या कालावधीतील सर्व वीज देयके रद्द करण्यात .येत असुन त्याऐवजी  वरील कालावधीकरीता ७४३२ युनिटची समान विभागणी करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावेत.

२) वरील कालावधीत ग्राहकाने भरणा केलेल्या वीज बिलाची रक्कम सूधारीत वीज देयकातुन वजावट करावी.

३) सुधारीत वीज देयकात कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | |
|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** |

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२९९/२०१०/२६/ दिनांक :-

प्रति,
श्री सुखदेव मराजी मोरे,
जलतरण तलाव रोड,
गरम पाणी औरंगाबाद.
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११७९७७०६)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/**२९९/२०१०/२६**)

आपण दिनांक ०५/०८/२०१० रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

प्रति,सविनय सादर
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.